

लोकशाही दिनाला प्रतिज्ञा घेतांना रा. से. यो. स्वयंसेवक.

तरुण भारत
शुक्रवार, २२ ऑगस्ट २०१४

# चव्हाण महाविद्यालयात महिलांना कायदेविषयक मार्गदर्शन

तभा वृत्तसेवा

**लाखांदूर, २१ ऑगस्ट**

स्थानिक यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात महिला समितीच्या वतीने युवादिनाचे औचित्य साधून महिलांसाठी कायदेविषयक मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमापूजनाने झाली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य पी. एम. ठाकरे तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी जिप अध्यक्ष अॅड. वसंता एंचिलवार, जिल्हा समन्वयक मृणाल मुनेश्वर यांची उपस्थिती होती.

प्रास्ताविक प्रा. अल्का दहीकर यांनी तर . संचालन रोहिणी हुमे आणि उपस्थितांचे आभार लीना मेश्राम यांनी मानले. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी प्रा. बोदेले, लाडे, कुरंजेकर, वासनिक, ठेंगरे, मस्के, तुरकर, तलमले, राऊत व कर्मचाऱ्यांनी [illegible] केले.



यशंतराव चव्हाण महाविद्यालयात योगा करतांना कर्मचारी वर्ग.



रा.से.यो. च्या वतीने सविधान दिनाला मार्गदर्शन
करतांना प्राचार्य पी. एम. ठाकरे.




रा.से.यो. च्या वतीने संविधान दिनाला मार्गदर्शन
करतांना प्राचार्य पी. एस. ठाकरे.



१२ जाने. ते २६ जाने. युवा पंधरवाड्यात मार्गदर्शन करतांना प्रा.बी.व्ही.बोदेले.




युवा पंधरवाड्यात मार्गदर्शन करतांना प्रा.डॉ.आर.यु.ठाकरे



आसोला ग्राम येथे वृक्षारोपण करतांना शिबीरार्थी




युवा पंधरवाड्यात वक्तृत्व स्पर्धेत सहभागी विद्यार्थीनी.




एच.आय.व्ही.(एड्स) रॅलीमध्ये सहभागी विद्यार्थी आणि प्राध्यापक



रेड रिबन क्लबच्या वतिने पोस्टर स्पर्धेचे परिक्षण करताना मान्यवर.

शुक्रवार, १९ जुलै २०१३ लोकशाही वार्ता

# जागतिक लोकसंख्या दिन साजरा

लाखांदुर : येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात निरंतर प्रौढ शिक्षण आणि विस्तार विभागाच्या संयुक्त विद्यमाने ११ जुलैला जागतिक लोकसंख्या दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य पी.एम.ठाकरे, प्रमुख अतिथी म्हणून प्रा.कुरंजेकर, प्रा.बोरकर, प्रा.तलमले उपस्थित होते. वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्यासाठी लोकसंख्या शिक्षणाचे अनन्यसाधारण महत्व आहे. आज भ्रष्टाचारापेक्षाही लोकसंख्या वाढ हे जागतिक आव्हान असल्याचे मत प्राचार्य ठाकरे यांनी मांडले. प्रमुख अतिथींनी वाढती लोकसंख्या व त्यावर उपाययोजना या संबंधाने मार्गदर्शन केले. वाढत्या लोकसंख्येचे दुष्परिणाम ... बेकारी भुकबळी, अनारोग्य,

# स्पर्धेच्या युगात टिकायचे असेल तर कठिण परिश्रम आवश्यक : खोब्रागडे

शहर प्रतिनिधी / ६ फेब्रुवारी

**लाखांदूर :आज स्पर्धेचे युग आहे आणि या स्पर्धेच्या युगात टिकायचे असेल तर कठ्गिण परिश्रम करणे आवश्यक आहे असे प्रतिपादन मातोश्री बाळजाबाई बुरडे हायस्कूल तथा ज्यु. कॉलेज आसोला येथे राष्ट्रीय सेवा योजना विद्यापिठस्तरीय शिबीरा अंतर्गत यशवंतराव चव्हाण महाविद्यालय लाखांदूर अंतर्गत आयोजित शिबीराच्या उद्घाटनाप्रसंगी संस्थापक भाग्यवान खोब्रागडे यांनी केले.**




स्वच्छ व निर्मल भारतासाठी युवकांचे योगदान या संकल्पनेवर आधारित दिनांक २१ जानेवारी २०१८ ते ०६ फेब्रुवारीपर्यंत असलेल्या या विद्यापिठस्तरीय शिबीराच्या उद्घाटनाप्रसंगी कार्यक्रमाचे उद्घाटक केदार, नायब तहसिलदार लाखांदूर कार्यक्रमाचे अध्यक्ष भाग्यवान खोब्रागडे, किसनराव खोब्रागडे, गोंडवाना विद्यापिठ गडचिरोली, सुशिल खोब्रागडे, किसन खोब्रागडे, माया नखाते, सरपंच आसोला, एल.एम.घोटे, ज्ञानेश्वर येरणे, कालीदास लाडे, तंमुस समिती आसोला हुकुमचंद दहिकर, माजी ग्रामपंचायत आसोला मोरेश्वर मोरघडे, चेतन मोरघडे, विद्यार्थी परिषद आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

यावेळी प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणातून मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची सुरुवात पाहुण्यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करुन नंतर विद्यापिठ गित संगित विशारद सपाटे यांच्या चमुने गायन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी दहिकर, प्रा.डॉ.आर.ठाकरे यांनी उपस्थित राहून कार्यक्रमास सहकार्य केले.




विद्यार्थिनींना कायदेविषयक मार्गदर्शन करतांना श्रीमती मृणाल मुनेश्वर
जिल्हा समन्वयक भंडारा

…लय, लाखांदूर. मा. सौ. दहिकर

प्रा. कुरंजेकर. प्रा. बोदेले.




आंतराष्ट्रीय युवा दिनानिमीत्य शपथ घेतांना मान्यवर।




रा.से.यो.च्या वतीने आंतराष्ट्रीय युवा दिनाला
ता. रुग्णालय, लाखांदूर. मा.सौ. दहिकर
मा.सौ. बन्सोड. प्रा. बोदेले.
प्रा. कुरंजेकर.



जागतीक महिला दिनाच्या कार्यक्रमाला उपस्थित महाविद्यालयीन
विद्यार्थीनी.



जागतीक महिला दिनाच्या कार्यक्रमात माल्यार्पण करताना प्रा.डॉ. के.वाय. ठाकरे व उपस्थित मान्यवर




स्वयंरोजगारासंबधी मार्गदर्शनपर भाषण देताना प्राचार्य पी. एस





विद्यार्थिनींना आरोग्यविषयी मार्गदर्शन करतांना डॉ. प्रमोद पदीरवाडे
वैद्यकीय अधिकारी मालेवाडा




स्वयंरोजगारासंबधी मार्गदर्शन करतांना सौ. घुर्वे मॅडम व्यवस्थापक,
महिला आर्थिक विकास महामंडळ, पंचायत समिती लाखांदूर



रा.से.यो.च्या वतीने संविधान दिना निमित्य संविधानाशी प्रास्ताविकाचे प्रतिज्ञा घेतांना.


MICROBIOLOGY SOCIETY
Students' Unit
YASHWANTRAO CHAWHAN COLLEGE
FREE BLOOD GROUPING CAMP
The Yash
the auspices of




एच.आय.व्ही.(एड्स) बद्दल मार्गदर्शन करतांना
मा.सौ.बन्सोड,समुपदेशक ग्रामीण रूग्णालय लाखांदूर




विभागीय कार्यालय
विज्ञान महाविद्यालय पवनी, जि. भंडारा
मधमाशी पालन प्रशिक्षण
खादी ग्रामोद्योग आयोग, नागपूर
विज्ञान महाविद्यालय, पवनी, जि.
मधमाशी प्रशिक्षण

सकाळ

नागपूर, शुक्रवार,
१५ ऑगस्ट २०१४



लाखांदूर : कार्यशाळेत पोस्टरचे अवलोकन करताना मान्यवर.

# एड्स प्रतिबंध व नियंत्रण कार्यशाळा

**लाखांदूर, ता. १४ :** स्थानिक यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात एड्स प्रतिबंध व नियंत्रण या विषयी मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रासेयोचे कार्यक्रम अधिकारी प्रा. बोंदेले होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून जयश्री बन्सोड, आशा काटवले, प्रा. कुरंजेकर, प्रा. अल्का दहीकर उपस्थित होते. आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त युवा सप्ताह साजरा करण्यात येत आहे. यात छायाचित्रण, कलाकृती, पोस्टर व घोषणा आणि स्लाईड शो इत्यादी स्पर्धा घेण्यात आल्या. छायाचित्रण स्पर्धेत स्वप्नील बडोले प्रथम तर रोहिणी हुमे प्रोत्साहनपर, कलाकृती स्पर्धेत लिना मेश्राम प्रथम, पोस्टर व घोषणा स्पर्धेत निखिलेश फुलेश्वर यांना प्रथम क्रमांक व सर्व सहभागी स्पर्धकांना प्रोत्साहनपर प्रमाणपत्र देण्यात आले. ... यांनी केले. आभार प्रा. आर.




एड्स दिनाला मार्गदर्शन करतांना मा. डॉ. सुधाकर शामरे
एस. एस. जे. महाविद्यालय; अर्जुनी व उपस्थित मान्यवर.



एड्स दिनाच्या निमित्याने रांगोळी स्पर्धेंचे परिक्षण करतांना मा. सचिनभाऊ खोब्रागडे, मा. प्राचार्य पी. एम. ठाकरे, व मान्यवर.

पुण्य नगरी
बुधवार, २८ सप्टेंबर २०१६ । भंडारा

# श्रीकांत बरिंगे यांचे व्याख्यान आज



लाखांदूर : वीर भगतसिंग यांच्या जयंतीनिमित्त मराठा सेवा संघ प्रणित वीर भगतसिंग विद्यार्थी परिषद शाखा लाखांदूर व यशवंतराव चव्हाण महाविद्यालय लाखांदूरच्या संयुक्त विद्यमाने २८ सप्टेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता यशवंतराव चव्हाण महाविद्यालय लाखांदूर येथे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व व्यक्तिमत्त्व विकास शिबिरात 'छत्रपती शिवाजी महाराज-भगतसिंग आणि आजची युवा पिढी' या विषयावर व्याख्यानाच्या कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून वक्ते श्रीकांत बरिंगे राहणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य पी. एम. ठाकरे हे राहणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हाध्यक्ष [illegible] प्रा. राकेश तलमले, प्रा. विनोद वली, प्रा. बोदेले उपस्थित राहणार आहेत. परिसरातील विद्यार्थी बांधवानी कार्यक्रमाला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन वीर भगतसिंग विद्यार्थी परिषद शाखा लाखांदूरचे तालुकाध्यक्ष आशीष ठाकरे, स. बि. प्रवक्ते भारत गजापुरे, प्रशांत नेवारे, अमोल राऊत, चेतन ढोरे यांनी केले आहे.

लाखांदूर : मार्गदर्शन करताना प्राचार्य ठाकरे व मंचावर उपस्थित अन्य.

पुण्यनगरी

# आंतरराष्ट्रीय शांततादिन साजरा

26 सप्टें २०१४



। लाखांदूर
दि. २५ (प्रतिनिधी)

येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय शांतता दिवस साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्रा. डी. एस. कुरंजेकर तर अतिथी म्हणून प्रा. बोंदेले, प्रा. गडपायले, प्रा. श्रीमती दुहीकर, प्रा. बोरकर, प्रा. वासनिक उपस्थित होते.

गौतम बुद्धांनी जगाला शांतीचा संदेश व सत्य, अहिंसेचे तत्त्वज्ञान दिले असून, म. गांधी यांनीही अहिंसेचा आग्रह धरल्याचे सांगत विश्वाला युद्धाची नको तर, बुद्धाची गरज आहे, असे प्रतिपादन प्रा. कुरंजेकर यांनी केले. प्रमुख अतिथींसह विद्यार्थ्यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रारंभी भारत गजापुरे यांनी प्रास्ताविक केले. लीना मेश्राम हिने कार्यक्रमाचे संचालन केले. कु. हुकरे हिने आभार मानले. प्रा. ठाकरे, प्रा. गणवीर, धनराज धोटे, सुधीर मोहुर्ले, किशोर कुर्झेकर, [illegible] वैद्य, रामदास [illegible] आदींनी कार्यक्रम यशस्वी करण्यास सहकार्य केले.

यावेळी प्राचार्य एस. एस. शेंडे, प्रा. पुण्यशील टेंभुर्णे, प्रा. देवघर, प्रा. यु. पी. शहारे, प्रा. सुधीर शहारे आदी उपस्थित होते.

# यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, लाखांदूर



लाखांदूर : यशवंतराव चव्हाण महाविद्यालय येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब
आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती महोत्सवानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन
करण्यात आले. प्राचार्य पी. एम. ठाकरे, प्रा. अनिल काणेकर, तत्वराज अंबादे
गटशिक्षणाधिकारी, प्राचार्य हजारे, चौर, प्रा. भोजराज बोदेले आदी उपस्थित
होते. या निमित्त संविधानातील बदल योग्य अयोग्य या विषयावर वादविवाद
स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत विद्या झोडे ही प्रथम तर द्वितीय क्रमांक
प्रणोली मेंढे हीने पटकाविला. वक्तृत्व स्पर्धेत डॉ. आंबेडकर यांना अभिप्रेत
असलेला भारत या विषयावरील स्पर्धेत प्रथम क्रमांक विद्या झोडे तर द्वितीय
शैलेश पिल्लेवान याने पटकाविला. निबंध स्पर्धेत प्रथम स्वप्नील बोरकर,
... शाहारे तर तृतीय क्रमांक दीपाली धनविज हिने मिळविला.

पुण्य नगरी
• शुक्रवार, २२ ऑगस्ट २०१४

# यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात कायदेविषयक शिबिर





**लाखांदूर**
दि. २१ (प्रतिनिधी)

येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात महिला समितीच्या वतीने युवादिनाचे औचित्य साधून महिलांसाठी कायदेविषयक शिबिर घेण्यात आले. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला माल्यार्पण व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्राचार्य पी. एम. ठाकरे, प्रमुख अतिथी माजी जि. प. अध्यक्ष अ‍ॅड. वसंत एंचिलवार, जिल्हा समन्वयक मृणाल मुनेश्वर उपस्थित होते.

अ‍ॅड. वसंत एंचिलवार यांनी याप्रसंगी मार्गदर्शन करताना संकटात सापडलेल्या महिलांच्या मदतीला धावून जावे असे आवाहन केले. मृणाल मुनेश्वर यांनी महिलांच्या समस्या, महिलांवर होणारे अत्याचार, प्रतिबंधात्मक कायदे, उपाययोजना, संरक्षण आदी विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले. महाविद्यालयीन तरुणींनी महिलांचे हक्क, कायदा, आत्मसंरक्षणासंदर्भात जागरूकता बाळगावी, असे आवाहन अध्यक्षस्थानावरून बोलताना प्राचार्य ठाकरे यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. अल्का दहीकर यांनी तर संचालन रोहिणी हुमे हिने केले. आभार लीना मेश्राम हिने मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. बोदेले, प्रा. लाडे, प्रा. कुरंजेकर, प्रा. वासनिक, प्रा. ठेंगरे, प्रा. मस्के, प्रा. तुरकर, प्रा. तलमले, प्रा. राऊत आदी प्राध्यापकवृंद व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

बुधवार, दि. २० ऑगस्ट २०१४



लाखांदूर : स्थानिक यशवंतराव चव्हाण महाविद्यालय लाखांदूर येथे महिला समितीच्या वतीने युवा दिनाचे औचीत्य साधून महिलांसाठी कायदेविषयक कार्यक्रम घेण्यात आला.

## महिलांसाठी कायदेविषयक

# यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात लोकसंख्यादिन



पुण्य
शनिवार, १९

लाखांदूर – निरंतर प्रौढ शिक्षण, विस्तार विभाग व भूगोल विभागाच्या संयुक्त विद्यमाने यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात नुकताच जागतिक लोकसंख्यादिन उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य पी. एम. ठाकरे, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. के. वाय. ठाकरे, प्रा. हरिश्चंद्र बोरकर, प्रा. भारत नखाते, प्रा. राकेश तलमले उपस्थित होते. प्राचार्य ठाकरे यांनी लोकसंख्येची गुणवत्ता वाढविण्यासाठी लोकसंख्या नियंत्रण व शिक्षणाची गरज असल्याचे सांगितले. तर प्रा. डॉ. वाय. के. ठाकरे यांनी लोकसंख्या वाढ रोखण्यासाठी लहान कुटुंब व सुखी कुटुंब ही काळाची गरज असल्याचे मत व्यक्त केले. लोकसंख्यादिनानिमित्त घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेत अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या सीमा हुकरे, सचिन लांजेवार, स्नेहल नागपुरे यांना पारितोषिक देण्यात आले. संचालन प्रा. डॉ. गणेश धोटे यांनी तर आभार प्रा. लाडे यांनी मानले. कार्यक्रमाला प्रा. वासेकर, प्रा. वासनिक, प्रा. बरडे, प्रा. तुरकर, प्रा. यू. डी. ठाकरे, प्रा. ठेंगरे, धनराज धोटे व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुण्य नगरी
सोमवार, १२ सप्टेंबर २०१६ | गोंदिया

# यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात स्वच्छता पंधरवडा

लाखांदूर : येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात स्वच्छता पंधरवडा कार्यक्रम १६ ते ३१ ऑगस्टपर्यंत घेण्यात आला. यामध्ये १६ ऑगस्ट रोजी 'रासेयो' विभागाच्या वतीने एकदिवसीय चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी 'स्वच्छता शपथ' घेण्यात आली. १७ व १८ ऑगस्ट या कालावधीत 'रासेयो'च्या वतीने महाविद्यालयीन परिसर स्वच्छ करण्यात आला. १९ व २१ ऑगस्टदरम्यान दत्तक ग्राम कुडेगावला भेट देऊन जनजागृती करण्यात आली. २२ ते २६ ऑगस्टदरम्यान दत्तक ग्राम कुडेगाव येथे जनजागृती शिबिर घेण्यात आले. २७ ते २९ सप्टेंबर रोजी गांधी चौक, आंबेडकर चौक तसेच लाखांदूर येथील परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. ३० ऑगस्ट रोजी संपूर्ण गावात 'स्वच्छता रॅली' काढून स्वच्छतेचा संदेश देण्यात आला आणि ३१ ऑगस्ट रोजी 'रासेयो' प्रमुखांसह चमूने भविष्यातही महाविद्यालय परिसर व महाविद्यालय स्वच्छ ठेवण्याचा संकल्प केला आहे.

सदर पंधरवडा महाविद्यालयाचे प्राचार्य पी. एम. ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. या कार्यक्रमाला रासेयोप्रमुख प्रा. बी. व्ही. बोंदेले, प्रा. आर. यू. ठाकरे, प्रा. नखाते, प्रा. बरडे, प्रा. तलमले, प्रा. बरडे, प्रा. गणवीर, प्रा. वासनिक, प्रा. लेदाडे, प्रा. भगत, प्रा. डॉ. गडपायले, प्रा. मस्के, प्रा. बिसेन, प्रा. लांजेवार, ठेंगरी, प्रा. रोकडे, प्रा. धोटे, प्रा. राऊत, प्रा. दहीकर, बन्सोड, कुर्झेकर, मसराम, धोटे, मोहुर्ले तथा महाविद्यालयीन कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

पुण्य नगरी
बुधवार, ६ डिसेंबर २०१७ । भंडारा

# यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात रासेयोच्या वतीने जागतिक एड्सदिन



**लाखांदूर :** स्थानिक यशवंतराव चव्हाण महाविद्यालय लाखांदूर येथे राष्ट्रीय सेवा योजना (रेडरिबन क्लब) तसेच महाराष्ट्र आरोग्य विभाग ग्रामीण रुग्णालय लाखांदूर यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक एड्सदिनांचे औचित्य साधून १ ते ८ डिसेंबर या सप्ताहानिमित्त महाविद्यालयात जागतिक एड्सदिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला अध्यक्ष प्रा.बी.व्ही. बोदेले, तर प्रमुख अतिथी जयश्री बन्सोड, संदीप पिलारे, प्रा.के झेड. लाडे, प्रा.राजेश वैद्य, रामदास सावरबांधे, प्रा.दिवठे आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.बोदेले यांनी म्हटले की, समाजामध्ये एड्सबद्दल पुरेपूर माहिती व जनजागृती करणे काळाची गरज आहे. तसेच शासनाच्या 'माझे आरोग्य, माझा अधिकार' या स्लोगनखाली १ ते ८ डिसेंबर सप्ताह दरम्यान समाजात जनजागृती करण्यासाठी महाराष्ट्र आरोग्य विभाग तालुका लाखांदूर येथील जयश्री बन्सोड समुपदेशक यांना येणाऱ्या काळात एड्समुक्त तालुका लाखांदूर करण्याचे आवाहन केले. सदर कार्यक्रमाला यशस्वितेसाठी प्रा. मेंढे, प्रा.बारसागडे, प्रा.गणवीर, निंबेकर, घोटे, भांडेकर, बन्सोड, मसराम यांनी सहकार्य केले. संचालन नीलेश तोंडरे तर आभार मेघा बगमारे हिने मानले.

यांनी संचालन केले. प्रणिता पाचखेडे, आदेश खान, भाग्यश्री खेडीकर, मयूर पडोळे, अश्विन नागदेवे, पल्लवी क्षीरसागर, गुलनाज शेख, पाशू खान, वसीम खान, अश्विनी बोरीकर, तौसिफ शेख यांनी सहकार्य केले.

समन्वयक प्रफुल्ल सावरकर, संघटक प्रा. अशोक गायधने, संजय करकरे यांनी उपयुक्त माहिती दिली. व्याघ्र निबंध स्पर्धेत हितेश चांदेवार, साक्षी तिडके, प्रेरणा बोरकर, अंकित शहारे यांनी प्रथम, दीपा

...भाऊ, बाळकृष्ण मेश्राम, बा.एस. ..., काशिवार, पुष्पा बोरकर, एच.ए. सोनवाणे, विनोद तिडके, जागेश्वर तिडके, एस. डब्ल्यू. चन्ने, संजय शेंडे, के. पी. बिसेन तसेच विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

दि. 13 ऑक्टोबर 2014 दैनिक - पुण्यनगरी.

# यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात साक्षरतादिन

**लाखांदूर**
दि. १२ (प्रतिनिधी)

येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय साक्षरतादिन साजरा करण्यात आला. रासेयो व निरंतर प्रौढ शिक्षण विभागाच्या वतीने साक्षरतादिनानिमित्त रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. प्राचार्य पी. एम. ठाकरे यांनी हिरवी झेंडी दाखवून या रॅलीचा शुभारंभ केला.

गावातून निघालेल्या या रॅलीत साक्षर जनता भूषण भारत, सब बढो, आगे बढो, अशा घोषणांचे फलक घेऊन विद्यार्थी सहभागी झाले होते. साक्षरता जनजागृतीविषयी नारे देत विद्यार्थ्यांनी नागरिकांचे लक्ष वेधून घेतले होते. महाविद्यालयात रॅलीचा समारोप करण्यात आला. या प्रसंगी कार्यक्रम घेऊन विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय साक्षरतादिनाचे महत्त्व पटवून देण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. डी. एस. कुरंजेकर, प्रा. एम. बी. वासेकर, प्रा. भारत नखाते, प्रा. कांतीलाल लडे, प्रा. हरीशचंद्र बोरकर, प्रा. बरडे, प्रा. तुरकर, प्रा. घोटे, प्रा. दहीकर, प्रा. बळी, भरत मेश्राम यांनी सहकार्य केले. या रॅलीचे नेतृत्व प्रा. बी.व्ही. बोंदेले व प्रा. के. वाय. ठाकरे यांनी केले.



# यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात जागतिक लोकसंख्या दिन उत्साहात

■ शहर प्रतिनिधी / लाखांदूर

यशवंतराव चव्हाण महाविद्यालय लाखांदूर येथे ११ जुलै रोजी निरंतर प्रौढ शिक्षण विस्तार विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने 'जागतिक लोकसंख्या' दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य पी.एम.ठाकरे हे होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा.डॉ.के.वाय ठाकरे, प्रा. बोरकर, प्रा.लाडे, प्रा. तुरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी प्राचार्य पी.एम.ठारे यांनी लोकसंख्या नियंत्रण व शिक्षण करज असल्याचे विचार मांडले. तसेच डॉ. के. वाय. ठाकरे यांनी लोकसंख्या वाढ रोखण्यास निरनिराळ्या उपाययोजना सांगुन 'लहान कुटुंब सुखी कुटुंब' यावर मार्गदर्शन केले.



विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरीत करताना मान्यवर.

लोकसंख्या दिनानिमित्ताने 'वाढती लोकसंख्या एक भीषण समस्या' या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली. यात बी.कॉम, प्रथम वर्षाचा विद्यार्थी लांजेवार तसेच द्वितीय व तृतीय आलेला विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर 'प्रमाणपत्र' देण्यात आले.

या कार्यक्रमाला प्रा.कुरंजेकर, प्रा.नखाते, प्रा. वासनिक, प्रा.बरडे, प्रा.गडपायले, प्रा.लांजेवार, प्रा.धोटे, प्रा. हरिक्रिष्ण दिवठे, प्रा. राऊत, प्रा.दहीकर, प्रा.भगवान बन्सोड, प्रा.गणवीर, धोटे, नागेश मसराम, कुरंजेकर, रंजीत दुबे, सावरबांधे व मोठ्या संख्येन विद्यार्थी उपस्थित होते.

## गीताचार्य तुकारामदादा महाविद्यालय

स्थानिक गिताचार्य तुकारामदादा महाविद्यालय लाखांदूर येथे जागतिक लोकसंख्या दिनाचे औचित्य साधून जागतिक लोकसंख्या दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य रविंद्र मैद हे होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा.विजय मेश्राम, प्रा.नरेश गजभिये, प्रा. प्रमोद नाकाडे आदी मान्यवर उपस्थित होते. जगात लोकसंख्येत भारत दुसऱ्या क्रमांकाचा देश असून देशाच्या प्रगतीमधील अडथळा वाढती लोकसंख्या आहे. त्यामुळे लोकसंख्या नियंत्रण काळाची गरज असल्याचे मैद यांनी सांगितले.

प्रा. मेश्राम यांनी वाढत्या लोकसंख्येमुळे अनेक समस्या निर्माण होतात. त्यामुळे 'हम दो हमारे दो' हे विचार आत्मसात करणे काळाची गरज आहे, असे मौलिक विचार व्यक्त केले. यावेळी कार्यक्रमाचे संचालन प्रा. [illegible] यांनी तर प्रास्ताविक प्रा. [illegible] यांनी केले तर आभार [illegible] यांनी मानले.

# महिलांनी आत्मनिर्भर व्हावे : धुर्वे

लाखांदूर : यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, लाखांदूर येथे दिनांक ९ मार्च २०१८ रोजी शुक्रवारला महिला विकास व महिला तक्रार निवारण समितीच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. या दिनाचे औचित्य साधून सर्व क्षेत्रातील महिलांशी संबंधित प्रश्नमंजूषा आणि रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाची सुरवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. या प्रसंगी कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक धुर्वे व्यवस्थापक, महिला आर्थिक विकास महामंडळ, पंचायत समिती लाखांदूर या उपस्थित होत्या तसेच अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य पी.एम.ठाकरे हे होते. प्रा. राऊत यांनी आपल्या प्रास्ताविकेतून जागतीक महिला दिनाच्या शुभेच्छा



देऊन समिती अंतर्गत घेतल्या जाणाऱ्या विविध कार्यक्रमाची माहिती विद्यार्थीनींना दिली.

सोबतच जागतिक महिला दिनाचा इतिहास सांगुण विद्यार्थीनींना या दिनाचे महत्त्व पटवून दिले. प्रमुख पाहुणे धुर्वे यांनी विद्यार्थीनींना शिक्षणाबाबत जागृत राहण्याचे आवाहन करून स्वयंरोजगारासंबंधी मार्गदर्शन केले. सोबतच पंचायत समितीअंतर्गत घेण्यात येणाऱ्या ब्युटी पार्लर, ड्रेस डिझाईनिंग, बॅग मेकिंग, संगणक प्रशिक्षण इ. विविध कार्सेसची माहिती दिली. तसेच महिलांनी आत्मनिर्भर राहुन स्वतः रोजगार करून स्वतःचे रक्षण करण्यास तत्पर रहावे. असे मत मांडले तसेच महिलांवर होणाऱ्या अत्याचारांवर विरोध कसा करावा याविषयी मार्गदर्शन केले.

प्राचार्य पी.एम. ठाकरे यांनी अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थीनींना प्रेरीत केले. इतिहासातील महिलांच्या आदर्शाबरोबरच गरिबीवर मात करून ज्या अनेक महिला पुढे आल्या आहेत. त्यांचाही इतिहास जाणून घेणे आणि चिकीत्सक दृष्टिकोन बाळगणे, असे मार्गदर्शन अध्यक्षीय भाषणातून केले. या कार्यक्रमाचे संचालन हेमलता नाकतोडे आणि आभार प्रदर्शन प्रा.ए.ए. दहिकर यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेकरीता समितीच्या सर्व सदस्यांनी प्रयत्न केले.

# चव्हाण महाविद्यालयात राष्ट्रीय युवा पंधरवाडा कार्यक्रम

शहर प्रतिनिधी/लाखांदूर

येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना रेड रिबन क्लबच्या वतीने १२ ते २६ जानेवारी या कालावधीत राष्ट्रीय युवा दिन साजरा करण्यात आला. या कालावधीमध्ये एड्स जनजागृती या विषयावर महाविद्यालयीन विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य पी. एम. ठाकरे तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून ग्रामीण रुग्णालयाच्या तालुका समुपदेशक डॉ. जयश्री बन्सोड, प्रयोगशाळा तंत्रज्ञ डॉ. आशा काठवले, रासेयो प्रमुख प्रा. बी. व्ही. बोदेले, कार्यक्रम अधिकारी रासेयो विभाग प्रा.डॉ.आर. यु. ठाकरे यांच्या उपस्थित होते.

या पंधरवाड्यात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यात भिंतीचित्र स्पर्धा, वक्तुत्व स्पर्धा, रांगोळी स्पर्धा इ. स्पर्धा घेण्यात आल्या. सदर भिंतीचित्र स्पर्धेत प्रशांत नेवारे प्रथम तर सोनाली मेश्राम द्वितीय तर रांगोळी स्पर्धेत आशीष नान्हे, चारूलता वघारे हे अनुक्रमे प्रथम




द्वितीय तसेच वक्तृत्व स्पर्धेमध्ये भारत मधुकर गजापुरे, रोहिणी हुमे, आशीष ठाकरे हे अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतिय क्रमांकाचे मानकरी ठरले.

वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरलेल्या भारत गजापुरे याने एड्स जनजाग्रुती या विषयावर प्रकाश टाकला. यावेळी एच.आय.व्ही.एड्स कशामुळे होतो, एड्समुळे देशाला असलेला धोका, आणी एड्सपासूच दुर राहण्याचे उपाय सुचवित समाजाला चारित्र्य जतन करण्याची गरज असल्याचे सांगून, एड्स बाधित व्यक्तीशी कसे वागले पाहिजे, याबाबत सांगितले.

विजेत्या स्पर्धकांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तिपत्र व रोख बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे संचालन प्रा. बी.व्ही.बोदेले यांनी केले तर आभार डॉ. आर. यु. ठाकरे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक , कर्मचारी व विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले.

08/02/17 दै० लोकशाही वार्ता

सकाळ नागपूर, सोमवार, ६ मार्च २०१७




लाखांदूर : कार्यशाळेत बोलताना मृणाल मुनेश्वर.

# महिला संरक्षणासंबधात कार्यशाळा

लाखांदूर, ता. ५ : यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात महिला लैंगिक तक्रार निवारण समितीतर्फे महिला सुरक्षेच्या संबंधाने मार्गदर्शनात्मक कार्यशाळा घेण्यात आली. प्रमुख मार्गदर्शक म्हणून महिला तक्रार निवारण समितीच्या जिल्हाध्यक्ष मृणाल मुनिश्वर उपस्थित होत्या, प्रमुख पाहुणे म्हणून महिला तक्रार निवारण समितीच्या तालुकाध्यक्ष सरस्वती मेश्राम उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थाती प्राचार्य पी. एस. ठाकरे होते. या वेळी मृणाल मुनेश्वर यांनी कामाच्या ठिकाणी किंवा सार्वजनिक ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळापासून संरक्षण करण्याकरिता असणाऱ्या कायद्याची जाणीव करुन दिली. विद्यार्थ्यांनींना आत्मनिर्भयतेचे धडे दिले. सरस्वती मेश्राम यांनी विद्यार्थिनींचा लैंगिक छळ होण्याचे कारणे, समस्या आणि उपाय यावर माहिती दिली. प्राचार्य ठाकरे यांनी विद्यार्थिनींना स्वतःला सक्षम करण्यास प्रोत्साहित केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. श्रीमती ए. ए. दहीकर यांनी केले. संचालन रोहिणी हुमे यांनी केले. आभार प्रा. आर. आर. राऊत यांनी मानले. आयोजनाकरिता समितीचे सदस्य प्रा. कुरंजेकर, प्रा. नखाते यांनी सहकार्य केले.

दै० तरुण भारत



# यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात जल व वन सप्ताह

तभा वृत्तसेवा
लाखांदूर, ३ एप्रिल

जागतिक वन व जल सप्ताहानिमित्त येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात विविध कार्यक्रम घेण्यात आले. अध्यक्षस्थानी प्राचार्य पी. एम. ठाकरे तर प्रमुख अतिथी म्हणून प्रा. डॉ. व्ही. एम. बळी, प्रा. डॉ. घोटे उपस्थित होते.

जीवन म्हणजे पाणी असून भूपृष्ठातील जलसाठा दिवसेंदिवस कमी होत आहे. भविष्यातील पाणी टंचाई दूर करण्याकरिता आतापासून पाण्याची बचत करणे गरजेचे असल्याचे मत प्राचार्य ठाकरे यांनी व्यक्त केले. जल व वन सप्ताहा दरम्यान निबंध, वक्तृत्व, पोस्टर अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या. याकरिता विद्यार्थ्यांचे उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



कार्यक्रमाप्रसंगी मार्गदर्शन करताना प्राचार्य ठाकरे व उपस्थित प्राध्यापक

प्रास्ताविक प्रा. डॉ. गणेश घोटे यांनी केले. संचालन प्रा. महेश डेंगरे यांनी तर आभार प्रा. डॉ. आर. यू. ठाकरे यांनी मानले. यशस्वीतेकरिता प्रा. डॉ. के. वाय. ठाकरे, प्रा. नखाते, प्रा. डॉ. राकेश ठाकरे, प्रा. बरडे, प्रा. तुरकर, प्रा. रोकडे, प्रा. बिसेन, प्रा. तलमले, प्रा. डेंगरे, प्रा.आर.यू. ठाकरे तथा सर्व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.



रॅलीला हिरवी झेंडी दाखविताना तहसीलदार व इतर अधिकारी

# वन्यजीव सुरक्षा सप्ताहानिमित्त जनजागृती रॅली

**लाखांदूर, १ ऑक्टोबर »**

वनविभाग भंडारा व वनक्षेत्राधिकारी कार्यालय लाखांदूर यांच्या वतीने वन्यजीव सुरक्षा सप्ताहानिमित्त १ ऑक्टोबर रोजी गांधी चौकातून जनजागृती रॅली काढून सप्ताहाची सुरुवात करण्यात आली.

यावेळी तहसीलदार संतोष महल्ले, खंडविकास अधिकारी डी. एम. देव्हारे, पोलिस निरीक्षक दामदेव मंडलवार, तालुका कृषी अधिकारी नीलेश गेडाम, वनक्षेत्र अधिकारी दोनोडे यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून सुरदात करण्यात आली. वन्यजीव सुरक्षा संदर्भात संदेश देत प्रमुख मार्गाने भ्रमण करून वनक्षेत्राधिकारी कार्यालयात रॅलीचा समारोप झाला. यावेळी घेण्यात आलेल्या कार्यक्रमाला अध्यक्षस्थानी प्रा. बी. व्ही. बडोले, तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. विश्वपाल हजारे, संजय प्रधान, सेवानिवृत्त वनपाल नीळकंठ राऊत, क्षेत्रसहायक व्ही. बी. पंचभाई, वनपाल के. टी. बगमारे उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी वन्यजीवांविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून वन्यजीव वाचवा, जंगले वाचवा असा मूलमंत्र दिला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक वनक्षेत्राधिकारी दोनोडे यांनी, तर संचालन वनकर्मचारी वासनिक यांनी केले. आभार वनक्षेत्र सहायक पंचभाई यांनी मानले. कार्यक्रमाला सिद्धार्थ कनिष्ठ महाविद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालय, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय येथील विद्यार्थी उपस्थित होते. यशस्वीतेकरिता वन कर्मचारी सय्यद, जाधव, गजापुरे, पुसतोडे, भुते व इतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. (तभा वृत्तसेवा)

तरुण भारत
www.tarunbharat.net

गुरुवार, २ मार्च २०१७

## अन्न भेसळ, विषयावर चर्चासत्र

लाखांदूर : स्थानिक यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात रसायनशास्त्र विभागाद्वारे अन्न भेसळ आणि रासायनिक विश्लेषण या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. चर्चासत्राचे उद्घाटन भाग्यवान खोब्रागडे यांनी केले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य पी. एम. ठाकरे, प्रा. सुधीर मस्के, प्रा. लेदाडे उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांना अन्न भेसळीबद्दल मार्गदर्शन करून भित्तिचित्र स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेत चारू बघारेने प्रथम, अभिजित मेश्रामने द्वितीय, नीकिता धेरेने तृतीय पुरस्कार पटकाविला. संचालन रोहिणी हुमणे, आभार नीलेश बोडे यांनी मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयीन कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येत उपस्थित होते.

देशोन्नती

# यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात मतदान जनजागृती कार्यक्रम

## मतदार हा लोकशाहीचा आधारस्तंभ : प्राचार्य पी.एम.ठाकरे

देशोन्नती

शहर प्रतिनिधी / १ ऑगस्ट /२०१८

लाखांदूर : प्रत्येक भारतीय नागरिकांचा संविधानात्मक हक्क असून मतदार हा लोकशाहीचा आधारस्तंभ असून प्रत्येकाने लोकशाहीला बळकटी आणण्यासाठी मतदानयादीत नोंद करुन मतदानाचा हक्क बजवावा असे प्रतिपादन यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात झालेल्या मतदान जनजागृती कार्यक्रमात प्राचार्य पी.एम.ठाकरे यांनी अध्यक्षीय भाषणातून व्यक्त केले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य पी.एम.ठाकरे हे होते. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून विजय उरकुडे उपजिल्हाधिकारी जिल्हा कार्यालय भंडारा मुत्तकर नायब तहसिलदार लाखांदूर आर.एम.राऊत जिल्हा कार्यालय भंडारा इत्यादी मान्यवरांच्या हजेरीत कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाचे मार्गदर्शक विजय उरकुडे मतदान जागृती संबंधाने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी वयाची १८ वर्षे पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी फार्म नंबर ६ भरुन आपले मतदान नोंदणी करुन आपल्या मतदानाचा अधिकार मिळविण्याचे आवाहन केले तसेच मुत्तकर आर.एम.राऊत यांनीसुध्दा मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थ्यांना पॉवर पॉईंट प्रोजेक्टरच्या माध्यमातून मतदान नोंदणीला व मतदानास स्वयंभू तयार होण्यास फायदा विद्यार्थ्यांना झाला.सदर कार्यक्रमाचे संचालन रासेयो प्रमुख प्रा.बी.व्ही.बोदेले यांनी केले तर प्रास्ताविक प्रा.डॉ.विनोद बढी यांनी केले तर आभार प्रा.के.झेड.लाडे यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. वासनिक, प्रा.डॉ. गडपायले, प्रा.डॉ. तलमले, प्रा.डॉ. के. वाय.ठाकरे, प्रा. कुरंजेकर, प्रा.डॉ.वासेकर, प्रा. बिसेन, प्रा. लांजेवार, प्रा.डॉ. नखाते, प्रा.गणविर, प्रा. मस्के, प्रा. दहिकर, प्रा.ठेंगरे, प्रा. बोरकर, प्रा.मेंढे, प्रा.डॉ.मोरघडे, निंबेकर, श्री.बन्सोड, नागेश मसराम, सावरबांधे, सुधिर मोहुर्ले, यासह खूप मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी उपस्थित राहून मतदान नोंदणीचा संकल्प केला.

पुण्यनगरी
शनिवार, १ एप्रिल २०१७ । भंडारा

# मधुमक्षिका पालनातून रोजगाराची संधी : प्राचार्य ठाकरे

भंडारा : यशवंतराव चव्हाण महाविद्यालय लाखांदूर येथे पाच दिवसीय मधुमक्षिका पालन प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. वासेकर हे होते. प्रमुख अतिथी म्हणून प्रा. उद्धव कोरे, देविदास राऊत, देवाजी पारधी, डॉ. विजय राऊत, प्रा. डॉ. गडपायले, प्रा. डॉ. बळी उपस्थित होते.

प्राचार्य पी. एम. ठाकरे यांनी प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांच्या मनातील मधुमक्षिकाविषयी भीती दूर करण्यास सांगितले व विविध उदाहरणांद्वारे



मधुमक्षिका पालनाचे महत्त्व सांगितले. प्रा. डॉ. गडपायले यांनी मधुमक्षिका पालनामुळे जैवविविधता वाढण्यास मदत होते, असे मत व्यक्त केले.

प्रा. रहेले यांनी शेतकऱ्यांच्या दृष्टीनेसुद्धा मधुमक्षिका पालन महत्त्वाचे आहे, असे मत मांडले. त्याचप्रमाणे प्रा. वासेकर, प्रा. डॉ. बळी, प्रा. कोरे, प्रा. गेडाम यांनी विचार मांडले.

कार्यक्रमाचे संचालन रोहिणी हुमे, प्रास्ताविक प्रा. महेश ठेंगरे यांनी केले तर आभार नयन कुंभारे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. गेडाम, प्रा. तलमले, प्रा. लांजेवार, प्रा. बिसेन, प्रा. वासनिक, प्रा. रोकडे, प्रा. मस्के, प्रा. लेदाडे, प्रा. भगत, प्रा. ठाकरे, प्रा. दिवठे, प्रा. बारसागडे, प्रा. तामगाडके, प्रा. लाडे, प्रा. बन्सोड, निंबेकर, मसराम, घोटे व महाविद्यालयीन विद्यार्थी व कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.